ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - I January - March - 2019

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

S.P. Mahavidyalaya, Bhoom
Tq. Bhoom Dist. O'bad

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मराठा साम्राज्य : महिलांची सामाजिक स्थिती व योगदान<br>**डॉ. शारदा बंडे** | १-४ |
| २ | अमरावती शहराच्या स्थानिक लोकसंख्येवर पर्यटन तिर्थक्षेत्राचा परिणाम<br>**प्रा. डॉ. वाघमारे अर्चना शिवाजी**<br>**प्रा. डॉ. राम ताटे** | ५-११ |
| ३ | मराठा साम्राज्य : भक्ती, महानुभाव, सूफी व वारकरी संप्रदाय आणि साहित्य<br>**पानखडे अनिल पांडुरंग** | १२-१७ |
| ४ | मराठा साम्राज्यातील जमीन महसूल धोरण व करपध्दती<br>**प्रा. के. एस. बन** | १८-२० |
| ५ | मराठा साम्राज्य : महिलांची सामाजिक स्थिती व योगदान<br>**प्रा. डॉ. सुरेखा सिताराम बनकर** | २१-२५ |
| ६ | मराठा साम्राज्य - जातीव्यवस्था आणि बलुतेदारी पध्दत<br>**प्रा. बोराडे तानाजी रामभाऊ** | २६-२९ |
| ७ | आरक्षण : सर्वांगीण विकासाचा एकमेव पर्याय ?<br>**डॉ. बोरोळे रजनी अनंतराव** | ३०-३५ |
| ८ | मराठी साम्राज्य : महसुल निर्मिती प्रणाली आणि कर धोरण<br>**चव्हाण गणेश शंकरराव** | ३६-३९ |
| ९ | मराठा साम्राज्य - जाती व्यवस्था आणि बलुतेदारी पध्दत<br>**डॉ. चौधरी हिरालाल रामचंद्र** | ४०-४३ |
| १० | मराठकालीन महिलांची सामाजिक स्थिती व राजकीय क्षेत्रातील स्त्रियांचे योगदान<br>**प्रा. डॉ. बारहाते संजिवनी चंद्रशेखर** | ४४-४८ |
| ११ | शिवकालखंडातील जमीन महसुल व्यवस्थेचा चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. गंगणे रतन व्यंकटराव** | ४९-५५ |
| १२ | मराठा साम्राज्य : महसुल निर्मिती प्रणाली आणि करधोरण<br>**महावीर त्रिंबक गायकवाड** | ५६-६० |
| १३ | आरक्षण : सर्वांगीण विकासाचा एकमेव पर्याय ?<br>**प्रा. डॉ. गायकवाड यशवंत जंगलू** | ६१-६५ |


S.P. Mahavidyalaya, Bhoom
Bhoom
Tq. Bhoom Dist. O.bad

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १३. आरक्षण : सर्वांगीण विकासाचा एकमेव पर्याय ?

**प्रा. डॉ. गायकवाड यशवंत जंगलू**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख, शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम, ता. भूम, जि. उस्मानाबाद.

भारतात महात्मा ज्योतिबा फुले यांनी प्रथम आरक्षणाची संकल्पना मांडली. त्यांनी 1883 साली हंटर आयोगाकडे शूद्राति शूद्रांसाठी आरक्षणाची मागणी केली होती. आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या राज्यात मागासवर्गीयांसाठी नोकऱ्या राखीव जागेच्या प्रश्नांचे महत्व ओळखून राखीव जांगांचा कायदा केला व ते राखीव जागांचे देशामधील जनक ठरले. शाहू महाराजांनी भारताची राज्यघटना अस्तित्वात येण्यापूर्वीच 4–8 वर्ष म्हणजे 26 जुलै 1902 रोजी आपल्या संस्थानात 50 राखीव जागा मागासवर्गीयासाठी ठेवल्या होत्या. भारतात हा कायदा पहिलाच असावा. आज भारताला स्वातंत्र्य मिळून 70–71 वर्ष होत आली. आपल्या देशाच्या राज्यघटनेत तरतूद केल्याप्रमाणे आजही नोकऱ्यातील आरक्षणाची हवी अशी अंमलबजावणी होत आहे. ओबीसी प्रवर्गासाठी राखीव जागा भारतीय लोकशाहीला त्यानंतरची 40 वर्ष लागली. मंडल आयोगाच्या शिफारशी अंमलात आणण्यास फारच काळ गेला. आज खाजगीकरण, परदेशी धोरणे, सरकारी मानसिकतेचा विचार केला तर आरक्षणाची घटनेला अभिप्रेत अशी अंमलबजावणी झाली नाही आणि होतही नाही. ही आजची सर्व संबंधितांची खंत आहे. म्हणून आजही शाहू महाराजांच्या आरक्षण धोरणांची, कायद्याची अंमलबजावणीची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

राजर्षी शाहू महाराजांनी 26 जुलै 1902 मध्ये कोल्हापूर संस्थानात आरक्षण लागू केल्यानंतर आरक्षणाचा प्रभाव इतर संस्थानातही पडलेला दिसतो. सन 1921 मध्ये म्हैसूर संस्थानात शिक्षण व नोकऱ्यात सवलती जाहीर करण्यात आल्या. तर 1927 ला मद्रास प्रातांत नोकरीस लागतांना जातीचा निकष लावण्यात आला.

महात्मा फुले आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आरक्षणाचा पाया घातला आणि डॉ.बाबासाहेबांनी आरक्षण धोरणास घटनात्मक दर्जा मिळवून दिला. संविधान तयार करतांना डॉ.आंबेडकर यांनी आरक्षण धोरणाला घटनात्मक बैठक दिली. राज्यघटनेनुसार शिक्षण, नोकऱ्या आणि राजकीय पदांमध्ये जातिनिहाय आरक्षण ठेवण्याची तरतूद केली आहे. अनुसुचित जाती आणि जमाती यांच्यापुरतेच हे आरक्षण मर्यादित होते. पुढे त्यात अन्य मागास जाती, अल्पसंख्यांक आदि समाजघटकांची भर पडली. आता त्यात मराठा आरक्षणाची ही भर पडली आहे.

**विविध आयोग**

"ब्रिटिश सरकारने सन1942 ला मराठा समाजाला मागास म्हणून आरक्षण दिले. परंतु स्वातंत्र्यानंतर या आरक्षणाचा समावेश राज्यघटनेत झाला नाही. नंतर ज्या जातीकडून आरक्षणाची मागणी झाली, त्याचा समावेश 'इतर मागासवर्ग' या प्रवर्गात झाला. त्यानंतर मराठा समाजाकडून आरक्षणाची मागणी सुरू झाल्यावर 'खत्री आयोग' नेमण्यात आला. मराठा कुणबी, कुणबी मराठा अशी ज्यांची जात आहे. त्यांचे मागासलेपण आहे, असे त्यांनी म्हटले. परंतु सरसकट सर्व मराठा समाजात ज्यांनी मागासलेपण आहे असे मात्र म्हटलेले नाही. मंडल आयोगानेही मराठा समुह वाचक असल्याने त्यांचा ओबीसीमध्ये समावेश करता येणार नाही. असा अहवाल दिला. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी 2004 साली न्यायमूर्ती आर.एम. बापट आयोग नेमला. बापट आयोगातही मराठा समाज मागासलेला नाही. त्यामुळे आरक्षणाची शिफारश करत नाही असे म्हटले. 'बी.पी. सराफ' आयोगानेही मराठा आरक्षणाची शिफारस केली नाही. यानंतर कॉंग्रेस आघाडीच्या शासनाने माजी मुख्यमंत्री 'नारायण राणे' यांच्या अध्यक्षतेखालील मराठा आरक्षणासाठी अभ्यास समिती नेमली. या समितीच्या शिफारशीच्या आधारे सन

2014 च्या विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर आघाडी सरकारने मराठा समाजाला शैक्षणिक व नोकरीत 16 टक्के आरक्षण जाहीर केले. मात्र त्याला 'केतन तिरोडकर' यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून आव्हान दिले. सरकारने मराठयांना सामाजिकदृष्टया व शैक्षणिकदृष्टया मागास असे वर्गीकृत कले आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आरक्षणासंबंधी आदेशाचे उल्लंघन होत आहे. त्यामुळे सरकारी मसुद्यामध्ये या राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयाचे रूपांतर करण्यास न्यायालयाने मनाई करावी, अशी विनंती तिरोडकर यांनी आपल्या याचिकेत केली होती. त्यामुळेच आयोगाने याही आरक्षणास स्थगिती दिली व आरक्षणाचे घोंगडे सन 2014 पासून भिजत पडले."[1]

यानंतर नव्याने सत्तेत आलेल्या भाजप–शिवसेना सरकारने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. त्यामुळे मराठा मागासवर्गीय आहेत. यासाठी नव्याने उच्च न्यायालयात पुरावे देण्याचे ठरविले.

मात्र, कोपर्डी येथील बलात्काराच्या व खुनाच्या घटनेनंतर मराठा समाजाच्या लाखोंच्या मूक मोर्चामुळे सरकारला धडकी भरली. 09 ऑगस्ट 2016 ला पहिला मराठा क्रांती मोर्चा औरंगाबाद येथे निघाला. त्यानंतर राज्यातील प्रत्येक जिल्हयासह देश विदेशात एकूण 58 ठिकाणी मराठा मूक मोर्चे काढण्यात आले. मुंबईतील ऐतिहासिक मोर्चाने या मोर्चाची सांगता झाली. त्यातच मराठा आरक्षणासाठी 40 तरूणांनी आत्महत्या केल्याने सरकार खडबडून जागे झाले. तेव्हा विनोद पाटील यांनी उच्च न्यायालयात मराठा आरक्षणावरून राज्यात आत्महत्याचे सत्र सुरू असून हिंसक आंदोलने होत आहेत. यामुळेच ही सुनावणी लवकरात लवकर घ्यावी. अशी याचिका दाखल केली. याची दखल उच्च न्यायालयाने घेतल्याने कामकाजाला गती आली.

राज्यसरकारने (11) अकरा सदस्यीय राज्य मागासवर्गीय आयोगाची स्थापना केली. माजी न्या.एम.जी.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाचे सदस्य म्हणून डॉ.एस.बी.निमसे, माजी सेवा निवृत्त अधिकारी सुधीर ठाकरे, डॉ.पी.जी.येवले, डॉ.सुवर्णा रावल, प्रा.सी.बी.देशपांडे, डॉ.डी.डी.बाळसराफ, प्रा.बी.व्ही.कार्डिले, आर.व्ही.जाधव, डॉ.आर. एन.करपे, तर डी.डी.देशमुख सदस्य सचिव होते. या आयोगामध्ये एकूण 11 सदस्य होते. न्यायालयाने सरकारला 11 जुलै 2018 पर्यंत राज्य मागासवर्गीय आयोगाचा अहवाल देण्याचे आदेश दिले. राज्य मागासवर्गीय आयोगाने पाच संस्थाकडून राज्यातील 4–5 हजार 700 कुटुंबाचे सर्वेक्षण केले. यात मध्ये 35 प्रश्नांची प्रश्नावली भरून घेण्यात आली. या आयोगाच्या शिफारशी 18 नोव्हेंबर रोजी राज्य सरकारने स्वीकारल्या. या अहवालातील शिफारशीच्या आधारेच 29 नोव्हेंबर 2018 रोजी राज्य विधिमंडळात राज्य सरकारने कृती अहवाल आणि मराठा समाजाला 16% आरक्षण देणारे विधेयक मांडले. ते एकमताने मंजूर करण्यात आले.

मागासवर्ग आयोगाने मराठा समाज हा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्टया मागास असल्याचा निर्वाळा दिला असून राज्यातील सेवामध्ये या समाजाचे प्रतिनिधित्व अपर्याप्त असल्याचे म्हटले आहे. अलिकडच्या कांही दिवसात आर्थिक निकषावर आरक्षण दिले जाते अशी मागणी सातत्याने केली जात होती. ही मागणी तशी कांही आज काल करण्यात येत होती. असेही नाही. संविधानात जातीच्या मागासलेपणाचा निकष ग्राहय मानून आरक्षणाची तरतूद करण्यात आली. मात्र, भारतीय समाजव्यवस्थेत जात हा पायाभूत, मूलभूत घटक आहे. त्यामुळेच खालच्या जातसमूहाचे शोषण केले जाते आणि त्यातुनच हा समाज सर्वच क्षेत्रात मागे राहिला. ही वस्तुस्थिती मान्य करण्यात आली. त्यामुळे आर्थिक निकषाची मागणी तेव्हा फेटाळण्यात आली होती. तरीही जातीच्या आधारवर न देता, आर्थिक निकषावर द्यावी अशी मागणी केली जाते.

**खुल्या प्रवर्गातील 10 टक्के आरक्षण**

"नरेंद्र मोदी सरकार आल्यापासून जातीच्या आरक्षणाचा मुद्दा गाजत आहे. महाराष्ट्रात मराठा, धनगर, मुस्लिम किंवा राज्याबाहेबर पटेल, जाट, गुर्जर या सर्व समाजाकडून आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलने करून सरकारला वेठीस धरले

होते. त्यात सवर्णांनीही आपली मागणी केली होती. आरक्षणाला मर्यादा असल्यामुळे केवळ आरक्षण देऊन मोकळेही होता येत नाही. त्यातच आता निवडणुका जवळ आल्यानंतर विरोधकही, विविध मुद्दे उकरून काढून सरकारला धारेवर धरणाचा प्रयत्न करत आहेत. अशावेळी केंद्रसरकारने दिनांक 07 जानेवारी 2019 सोमवार रोजी हे विधेयक झाले. केंद्रसरकारने मोठा निर्णय घेतला आहे. तो म्हणजे आर्थिकदृष्टया दुर्बल, सवर्णांनाही शिक्षण आणि सरकारी नोकरीत 10 टक्के आरक्षण मिळणार आहे. यासाठी मोदी सरकार घटना दुरूस्ती करून आरक्षण कोटयात वाढ करणार आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने या निर्णयाला मंजुरी दिली आहे. आता प्रथमदर्शनी आर्थिकदृष्टया दुर्बल सवर्णांना शिक्षण आणि नोकरीत आरक्षण दिल्यामुळे त्याचे पडसाद काय उमटतील. याची पर्वा न करता त्यांनी हा निर्णय घेतला आहे. हे सवर्णाचे सरकार असा कदाचित त्यांच्यावर आरोप घेण्याची भीतीही आहे. मात्र, तसे असले तरी सुमारे 125 मतदार संघात सवर्णांचा प्रभाव आहे. त्या ठिकाणी त्यांना फायदाही होऊ शकतो. परंतु, ऐन निवडणुकीच्या तोंडावर हा निर्णय घेतल्यामुळे आपण प्रत्यक्षात तो सर्वोच्च न्यायालयात टिकेल की नाही याबाबत साशंकता असल्यामुळे या निर्णयाकडे संशयाने पाहिले जात आहे."[2]

वास्तविक पाहता भारताची राज्यघटना ही लेखी आहे. ती दुरूस्त करण्याची प्रक्रिया ही अतिशय किचकट आहे. राज्यघटनेच्या अनुच्छेद 368 नुसार मंजुरी घ्यावी लागते. राज्यघटना दुरूरत करण्यासाठी लागणारे बहुमत ही अडचणीची गोष्ट असून सुध्दा भारतीय राज्यघटना ही 124 वी दुरूस्ती ही अत्यंत वेगवान दुरूस्ती म्हणून ओळखली जाणार आहे.

दि. 07 जानेवारी 2019 रोजी विधेयक झाले. 8 जानेवारी 2019 रोजी लोकसभेने ते रात्री मंजूर केले आणि राज्यघटनेने 09 जानेवारी 2019 रोजी रात्री मंजुर केले आणि 12 जानेवारी रोजी राष्ट्रपतीची मंजुरी सुध्दा मिळाली म्हणजेच अतिशय वेगवान दुरूस्ती असेच म्हणावे लागेल.

या आरक्षणाबाबत संमिश्र प्रतिकिया येत आहेत. कांही सवर्णाना हलाखीच्या परिस्थितीमुळे शिक्षण घेता येत नाही. आणि अनुषंगाने नोकरीही मिळविणे शक्य होत नाही. त्यांच्यासाठी मग ही संधी ठरू शकेल. परंतु त्याची मर्यादा 8 लाख केल्यामुळे ही संधी अशा गांजलेल्यापर्यंत पोहोचेल का? याबाबतीत मात्र साशंकता आहे.

आता कॉंग्रेसन कितीही अविश्वास निर्माण केला असला तरी हेच आरक्षण 25 सप्टेंबर 1991 रोजी 'नरसिंह राव' सरकारने आर्थिक आधारावर 10% आरक्षण दिले होते. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या नउु न्यायाधिशांच्या घटनापीठाने ते घटनाविरोधी ठरविले व रद्द केले.

पुन्हा आर्थिक आधारावर दिलेले आरक्षण न्यायालयात टिकणार नाही. त्यासाठी घटनादुरूस्ती केली तरी ती संविधानाच्या मूळ चौकटीला बाधा आणणारा असल्याने न्यायालयात संमत होणार नाही. जर खरोखरंच मनापासून हे आरक्षण दिले आणि ते न्यायालयात ही टिकू शकले तर त्याचा फायदा मोदी सरकारला नक्कीच होऊ शकेल. सुमारे 98% लोकांना या आरक्षणाचा फायदा होऊ शकेल. जर हे न्यायालयात टिकाव धरू शकले तर मैलाचा दगड ठरू शकेल.

आजपर्यंत मुख्यत्वेकरून आरक्षणाचे तीन टप्पे म्हणता येतील यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या काळातील दलितांचे आरक्षण, त्यानंतर मंडल आयोगाचे ओबीसींचे आरक्षण, आणि आत्ताचे सवर्णाचे आरक्षण. या आरक्षणाच्या बाबतीत असे म्हणता येईल की प्रत्यक्षात त्याचा फायदा खऱ्या गरजवंताना मिळेल का? त्याबाबत ही गोंधळ होऊ शकतो. दारिद्रय रेषेखाली जे लोक **आहेत ज्यांचे वार्षिक उत्पन्न** 27 हजार आहे. तर आरक्षण मिळविण्यासाठीची मर्यादा वार्षिक 8 लाखांची आहे. म्हणजे खरी **गरज 27 हजार वाल्यांना आहे की 8 लाख वाल्यांना आहे. याबाबत स्पष्ट आणि प्राधान्य** ठरवायला हवे. अन्यथा या **आर्थिकदृष्टया आरक्षणाचा काहीही उपयोग होणार** नाही.

S.P. Mahavidyalaya, Bhoom Tq. Bhoom
S.P. Mahavidyalaya, Bhoom Bhoom Dist. O'bad

**आरक्षणाचे फायदे**

सर्वप्रथम साकल्याने विचार केल्यास भारतीय राज्यघटनेत याबाबत जी तरतुद केली आहे. तिचा उद्देश जातीव्यवस्थेने पिडलेल्या, दबलेल्या, मागास व उपेक्षित वर्गास सर्वांच्या बरोबरीने आणणे हा आहे.

आता फार मोठा समाज आरक्षण, मिळाल्यामुळे खुष आहे. त्यामुळे अन्याय, अत्याचारांचे प्रमाण कमी होण्यास मदत मिळेल व मागास समाजाचा द्वेष करणेही कमी होईल. कारण मोठा समाज आरक्षणाच्या कक्षेत येत आहे. त्यामुळे सामाजिक समता वाढण्यास मदत होईल. साधारणतः 34.5% अन्य समाजघटकाला उपलब्ध झाले. आजमितीस 34.5% आरक्षण या समाजास उपलब्ध असल्यामुळे या समाजाने प्रक्षुब्ध होण्याचे कारण नाही या निर्णयामुळे मराठा समाज नोकऱ्यात जो उपेक्षित होता त्यास पुरेसे प्रतिनिधित्व मिळेल.

"ज्या समाजाची जेवढी लोकसंख्या असेल तेवढे आरक्षण त्या समाजास मिळणे न्यायसंगत आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी जनगणना व शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय मागासलेपण हे निकष लावून या प्रश्नांची सोडवणूक करणे शक्य आहे. आता मोठा वर्ग आरक्षणाच्या कक्षेत आल्यामुळ अन्याय, अत्याचारचे प्रमाण कमी होईल व मागासवर्गीय समाजाचा द्वेष करणे ही कमी होईल."3

आरक्षणाचा फायदा असा की, आरक्षणामुळे सर्व समाजाला पुरेसे प्रतिनिधित्व मिळेल. त्यांच्यात जागृती होईल व जाती अंताची लढाई गतिमान होईल. आरक्षित घटकांना मिळणाऱ्या सवलतीमुळे या घटकातील एक वर्ग मोठा झाला. त्याला मिळालेल्या सवलतीमुळे मागचा मोठा झाला आणि आपण मात्र आहोत. त्यापेक्षा मागे राहिलो ही भावना इतर जातीमध्ये आहे. वाढती महागाई व महागडे शिक्षण घेणे सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले हेच खरे वास्तव आहे. विचारातुन आरक्षणाची मागणी होत आहे. खऱ्या अर्थाने आरक्षण म्हणजे हजारो वर्षापासून समाज व्यवस्थेने नाकारलेल्या वर्गाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण व नोकऱ्यात दिलेल्या सवलती होत. थोडक्यात आरक्षण म्हणजे एक प्रकारची भरपाई आहे. घटनेच्या 46 व्या कलमात देशातील एस.सी., एस.टी., व अन्य दुर्बल जातीसाठी सरकारने प्रयत्न करावा असे नमूद करण्यात आले आहे.

शिक्षणात आरक्षित घटकाशिवाय असणारी ई.बी.सी. सवलत हा त्याचाच एक भाग आहे. ई.बी.सी. सवलत ही कोणत्याही जातीसाठी लागू आहे. एस.सी., एस.टी., ओ.बी.सी. यांच्या नोकऱ्यावर खासगीकरणामुळे गंडातर आले असले तरी या वर्गाला शिक्षणात प्रवेश घेतांना शिक्षण शुल्कात फी माफी व निर्वाह भत्ता मिळत असल्यामुळे नव्याने इंजिनिअरिंग, मेडिकल, एम.बी.ए. सारखे व्यावसायिक शिक्षण घेणे सोपे झाल्याने त्या बळावर खासगी कंपनीत का होईना नोकऱ्या मिळू लागल्याने आरक्षित घटकातील एक वर्ग मोठा होतांना आरक्षण न मिळणाऱ्या समाजातील तरूण पाहात होता. वाढती महागाई मुळे चार–दोन एकर शेती असणाऱ्यालाही निसर्गाच्या अवकृपेमुळे मुलांबाळांना महागडे शिक्षण देणे अवघड झाले. अशा प्रकारच्या विवंचनेतुनच आरक्षणाच्या मागणीने जोर धरला असे दिसून येते.

**मराठा समाजाची पीछेहाट थांबेल**

महाराष्ट्रात मराठा समाज मोठया प्रमाणात आहे यात 10 ते 20 टक्के श्रीमंत आहेत, तर 70 ते 80 टक्के मराठा समाज हा हलाखीचे जीवन जगत आहे. शासनाच्या या निर्णयाचा फायदा त्यांना होईल त्यांचे जीवनमान सुधारण्यास मदत होऊन त्यांची पिछेहाट थांबेल. आज महाराष्ट्रात मराठा समाजाची भीषण अवस्था असल्याचे निदर्शनास येते. खानदेश, मराठवाडा, तसेच पश्चिम महाराष्ट्रात मराठा समाजाची भीषण अवस्था असल्याचे निदर्शनास आल्या शिवाय राहत नाही. त्यामुळे अनुसुचित जाती, जमाती, ओबेसी प्रमाणे मराठा समाजातील गरिबांना आरक्षणाची गरज होती. ती सरकारच्या या निर्णयामुळे पूर्ण झाली.

S.P. Mahavidyalaya Bhoom Dist. Osmanabad BHOOM
PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya,Bhoom
Dist.Osmanabad

आजपर्यंत अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. याच शेतकऱ्यांच्या आत्महत्येला न्याय देतांना त्यांच्या मुलांबाळांना आरक्षणाचा लाभ देऊन त्यांच्या नवीन पिढीला कुठेतरी पुढे येण्यची संधी देण्याची आवश्यकता आहे.

विश्व मानवाधिकार संघटनेने काढलेल्या निकषानुसार भारतात 60 टक्के जनता ही दारिद्रेरेषेखालील आहे. महाराष्ट्रात शासकीय आकडेवारीनुसार 40 टक्के जनता दारिद्र्यरेषेखाली आहे प्रचलित आरक्षणामध्ये दारिद्र्यरेषेखालील लोकांचाही गरीब म्हणून समतेच्या तत्वानुसार यामध्ये समावेश होतो. आर्थिक दुर्बल हा निकष लावून केवळ दारिद्र्य रेषेखालील संख्या घेतल्यास 40 ते 60 टक्के मर्यादेपर्यंत लोकांना आर्थिक निकषावर आरक्षण द्यावे लागेल.

महाराष्ट्र राज्यामध्ये विदर्भात, पश्चिम महाराष्ट्रात मराठा समाजाला कुणबी वा इतर मागासवर्गात येणाऱ्या जातीचे दाखले दिले जातात. परंतु मराठवाडयात मात्र कुणबी म्हणून मराठयांना गणले जात नाही. त्यामुळेच या आरक्षणाचा खरा लाभ मराठवाडयालाच होईल असे वाटते. खरेतर इतिहासातील घटनांचा मागोवा घेतला असता शेती करणारा जो कोणता वर्ग असेल तो सर्वच कुणबीच म्हणायला पाहिजे. परंतु इतिहासात वेळप्रसंगी राज्यकर्त्यांच्या सोयीनुसार शेतकरी वर्गात फुट पाडून सोयीनुसार मराठा, कुणबी, लेवा पाटील, अहिर, आगरी असे प्रवर्ग निर्माण झाले त्यातुनच 51 टक्के असलेला शेतकरीवर्ग लहान होत. आता जात प्रमाणानुसार मराठा म्हणून 34 टक्के महाराष्ट्रात गणला जातो.

राज्यकर्ता म्हणून ओळखला गेलेला मराठा समाज मोठेपणात गरीब कधी झाला हे कळालेच नाही आणि आता केव्हा भिकेचे डोहाळे लागले तेव्हा आरक्षणाची गरज भासू लागली आहे. त्यातुनच हा लढा निर्माण झाला. मराठा समाजाच्या आरक्षणाचे खरे विरोधक हे मराठा समाजाचेच मोठे नेते होते.

प्रामुख्याने शेतीवर गुजराण करणारा मराठा समाज सामाजिक दृष्टया मागास असल्याचा निष्कर्ष मागासवर्ग आयोगाने काढला असून आयोगाने केलेल्या सर्वेक्षणात 76.86 टक्के मराठा कुटुंब शेती आणि शेतमजुरीवर अवलंबून असल्याचे आढळून आले.

शैक्षणिकदृष्टयाही मागास असलेल्या समाजात केवळ शिक्षणाचे प्रमाणे हे केवळ 6.71 टक्के असल्याचे दिसून येते.

वरील प्रमाणे सर्वकष विचार केला गेला तर आरक्षण हाच सर्वांगीण विकासाचा एकमेव पर्याय ठरू शकतो.

**संदर्भ**

1. दै.लोकमत पेपर औरंगाबाद – संपादकीय पान.नं.6 अंक 315, दि.30 नोव्हेंबर 2018
2. दै.सम्राट पेपर मुंबई – संपादकीय पान नं.6, दि.9 जाने. 2019
3. दै.सम्राट पेपर मुंबई – पान नं.4, दि.11 जाने. 2019

S.P.Mahavidyalaya, Bhoom Dist.O.bad

PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya,Bhoom
Dist.Osmanabad